(सर्व कायदेशीर अथवा न्यायालयीन विवादासाठी या आदेशाचा इंग्रजी अनुवाद अधिग्राह्य धरण्यात येईल.)

<u>वनजमीन-गडचिरोली</u>

प्रशासकीय इमारत व पोलिस अधिकारी / कर्मचारी यांचेसाठी निवासस्थान (Arm Out Post) बांधण्यासाठी मौ.आलदंडी (नेंडर कॅम्प), ता.एटापल्ली, जि.गडचिरोली येथील २.०० हे. संरक्षित वनजमीन वळती करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन निर्णय क्रमांकः एफएलडी-२०१९/प्र.क्र.१११/फ-१०
मंत्रालय,मुंबई - ४०० ०३२
दिनांक: २५.०४.२०१९

<u>प्रस्तावना:-</u>

पोलीस अधीक्षक, गडचिरोली यांनी प्रशासकीय इमारत व पोलिस अधिकारी / कर्मचारी यांचेसाठी निवासस्थान (Arm Out Post) बांधण्यासाठी मौ.आलदंडी (नेंडर कॅम्प), ता.एटापल्ली, जि.गडचिरोली येथील २.०० हे. संरक्षित वनजमीन वळतीकरणाचा प्रस्ताव सादर केला आहे. सदर प्रस्तावाच्या सविस्तर छाननीअंती त्यास मंजुरी देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>शासन निर्णय :-</u>

भारत सरकारच्या आदेश क्रमांक-F.No.११-९/९८/FC, दि.१३.०५.२०११ व दि.१६.६.२०११ अन्वये राज्यांना दिलेल्या अधिकाराचा वापर करून,महाराष्ट्र शासन, याद्वारे अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा केंद्रस्थ अधिकारी, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे पत्र क्र.Desk-१७/NC/I/I.D २२३९/१८-१९, दि.२६.०२.२०१९ अन्वये मौ.आलदंडी (नेंडर कॅम्प), ता.एटापल्ली, जि.गडचिरोली येथील (स. नं. ७४/१, कक्ष क्र.१७) २.०० हे. संरक्षित वनजमीन प्रशासकीय इमारत व पोलिस अधिकारी / कर्मचारी यांचेकरिता निवासस्थान (Arm Out Post) बांधण्यासाठी वन (संवर्धन) अधिनियम, १९८० च्या कलम-२ अंतर्गत वळती करण्याबाबत सादर केलेल्या प्रस्तावास **तत्त्वत:** मंजूरी देत आहे.

२. सदर प्रस्तावास खालील अटींच्या अधीन राहून मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

१) वनक्षेत्राचा वैधानिक दर्जा बदलणार नाही.

२) प्रस्तावामध्ये ज्या कारणासाठी वनजमीन मागणी केलेली आहे त्या कारणाशिवाय इतर कारणासाठी वनजमिनीचा वापर करता येणार नाही.

३) प्रकल्प यंत्रणेस प्रस्तावित २.०० हे. वनजमिनीकरीता नक्त वर्तमान मूल्याची रक्कम अदा करावी लागेल.

४) केंद्र शासनाच्या नवीन मार्गदर्शक सूचनेनुसार / सुधारित दरानुसार प्रकल्प यंत्रणेस ता नक्त वर्तमान मूल्याची रक्कम अदा करावी लागेल.

५) प्रकल्पामध्ये वक्षतोड करता येणार नाही.

६) वनजमीन वळतेकरणासंबंधी इतर कायदे, अधिनियम व मार्गदर्शक सूचनांचे पालन करणे प्रकल्प यंत्रणेवर बंधनकारक असेल.

७) प्रकल्प यंत्रणेने उपरोक्त अटींची पूर्तता केल्यानंतर उक्त प्रयोजनासाठी वनजमीन वळतीकरणास राज्य शासन अंतिम मंजुरी प्रदान करेल, तद्नंतर मुख्य वनसंरक्षक (प्रा.), गडचिरोली हे वरील अटींची पूर्तता झाल्याची खातरजमा करुन प्रत्यक्षात वनजमीन वळतीकरणाची कार्यवाही करतील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०४२५१२४१५६८४१९ असा आहे. सदर शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

VIRENDRA RAMBAHAL TIWARI

Digitally signed by VIRENDRA RAMBAHAL TIWARI
DN: CN = VIRENDRA RAMBAHAL TIWARI, C = IN, S = Maharashtra, O = GOVERNMENT OF MAHARASHTRA, OU = FOREST DEPARTMENT
Date: 2019.04.25 12:49:49 +05'30'

(वीरेन्द्र तिवारी)

अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (मंत्रालय)

प्रत:-

१. सचिव, पर्यावरण,वन व जलवायु परिवर्तन मंत्रालय,भारत सरकार,नवी दिल्ली.
२. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (केंद्रीय), पश्चिम-मध्य क्षेत्र, पर्यावरण, वन व जलवायु परिवर्तन मंत्रालय, भारत सरकार, नागपूर.
३. अपर मुख्य सचिव (गृह), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
४. प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
५. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
६. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा केंद्रस्थ अधिकारी, महाराष्ट्र राज्य, नागपूर
७. विभागीय आयुक्त,नागपूर विभाग,नागपूर.
८. जिल्हाधिकारी,गडचिरोली.
९. मुख्य वनसंरक्षक (प्रा.),गडचिरोली.
१०.पोलीस अधीक्षक,गडचिरोली.
११.उपवनसंरक्षक, आल्लापल्ली.
१२.निवडनस्ती (फ-१०).

Forest Land-Gadchiroli
Diversion of 2.00 ha. Protected Forest Land for construction of Administrative Building & Residential Quarters for Officers and Police Staff (Arm Out Post) At-Aaldandi (Nender Camp), Tal-Ettapalli, District- Gadchiroli.

Government of Maharashtra
Revenue and Forest Department
Government Resolution No.: FLD-2019/CR-111/F-10
Mantralaya, Mumbai 400032
Date: 25.04.2019

Preamble: -

Superintendent of Police, Gadchiroli has submitted a proposal for diversion of 2.00 ha. Protected Forest Land for construction of Administrative Building & Residential Quarters for Officers and Police Staff (Arm Out Post) At-Aaldandi (Nender Camp), Tal-Ettapalli, District- Gadchiroli. After careful consideration and scrutiny of the proposal, the Government is pleased to grant 'in-principle' approval as under-

Government Resolution:-

In exercise of powers delegated to the State Government, vide Government of India's order no. F. No.11-9/98/FC, dated 13.05.2011 and dt.16.06.2011, Government of Maharashtra is pleased to grant **'in-principle'** approval to the diversion of 2.00 ha. of Protected Forest Land (Survey No. 74/1 / Compt. No. 17) At-Aaldandi (Nender Camp), Tal-Ettapalli, District-Gadchiroli under section-2 of the Forest (Conservation) Act, 1980 for construction of Administrative Building & Residential Quarters for Officers and Police Staff (Arm Out Post) as per the proposal submitted by Additional Principal Chief Conservator of Forests & Nodal Officer, Maharashtra State, vide its letter no. Desk -17/NC/I/I.D-2239/18-19, dated 26.02.2019.

2. This approval is issued subject to the following conditions:-

1) The legal status of the land required will remain unchanged.
2) The forest land shall not be used for any purpose other than specified in the Proposal.
3) The Project Authority will defray cost of Net Present Value for 2.00 ha. of Forest Land.
4) The Project Authority will defray cost of the additional/revised Net Present Value as per the latest guideline of the Government of India.
5) No trees will be felled during implementation of the project.

6) All other conditions as may be mandatory under relevant Acts, Rules & Guidelines shall be complied with by the User Agency.
7) The final approval shall be granted by the State Government after fulfilment of the above conditions by the User Agency. The actual diversion of forest land shall be effected thereafter by the Chief Conservator of Forests (T.), Gadchiroli.

This Government Resolution of Maharashtra Government is available at the website www.maharashtra.gov.in. with Reference no. 201904251241568419. This Resolution has been signed digitally.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

VIRENDRA RAMBAHAL TIWARI

Digitally signed by VIRENDRA RAMBAHAL TIWARI
DN: CN = VIRENDRA RAMBAHAL TIWARI, C = IN, S = Maharashtra, O = GOVERNMENT OF MAHARASHTRA, OU = FOREST DEPARTMENT
Date: 2019.04.25 12:50:23 +05'30'

(Virendra Tiwari)
Additional Principal Chief Conservator of Forests (Mantralaya)

Copy:-

1. Secretary, Ministry of Environment, Forests & Climate Change, Government of India, New Delhi.
2. Additional Principal Chief Conservator of Forests (Central), Ministry of Environment, Forests & Climate Change, Government of India, Regional Office, Western Central Zone, Nagpur.
3. Additional Chief Secretary (Home), Mantralaya, Mumbai.
4. Principal Secretary, Tribal Development Department, Mantralaya, Mumbai.
5. Principal Chief Conservator of Forests (Head of Forest Force), Maharashtra State, Nagpur.
6. Additional Principal Chief Conservator of Forests & Nodal Officer, Maharashtra State, Nagpur.
7. Commissioner, Nagpur Division, Nagpur.
8. Collector, Gadchiroli.
9. Chief Conservator of Forests (T), Gadchiroli.
10. Superintendent of Police, Gadchiroli.
11. Deputy Conservator of Forests, Allapalli.
12. Select File (F-10)